जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २५.१२.२०२५**

''१ किलो ९०४ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व अवैद्य अग्निशस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारास अटक''

महाराष्ट्रात आगामी निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर आचारसंहिता चालु असुन त्या दृष्टीने मा.पोलीस आयुक्त, ठाणे यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखणे आणि निवडणुका निर्भयपणे पार पाडण्यासाठी अवैद्य अग्निशस्त्र बाळगणारे व अवैद्य धंदे करणाऱ्या इसमांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने गुन्हे शाखा घटक - २, भिवंडी येथील पोशि/१९९७ अमोल इंगळे यांना दिनांक २४/१२/२०२५ रोजी बातमी मिळाली की, ''इसम नामे आरीफ सिध्दीकी हा गांजा या अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी गायत्रीनगर, भिवंडी या ठिकाणी येणार आहे.'' अशी बातमी मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या अधिपत्याखाली सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रविंद्र बी. पाटील यांनी पथकासह शहजाद यांचे घराचे मागील बाजूस गल्लीत, फैजे-आम हायस्कुल जवळ,न्यु आझादनगर, भिवंडी या ठिकाणी सापळा रचुन आरोपी आरीफ अबरार अहमद सिध्दीकी, वय.१९ वर्षे. राहणार- भाडयाची खोली, आयुबभाई हॉटेलच्या मागे, गौसिया मशिद जवळ, शांतीनगर, भिवंडी यास पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीमध्ये १ किलो ९०४ ग्रॅम वजनाचा गांजा असा अंमली पदार्थ तसेच ०१ माऊझर/पिस्टल व ०१ जिवंत काडतुस असा एकुण १,२०,६००/- रू. किमतीचा मुद्येमाल मिळुन आला. सदर आरोपी याच्याविरूद्ध शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी गुन्हा रजि. नं. १३८३/२०२५, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), २० (ब), २९ सह शस्त्र अधिनियम कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउनि/रामचंद्र जाधव, गुन्हे शाखा, घटक - २ भिवंडी हे करीत आहेत.

वरील कामगिरी ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे, व श्री.शेखर बागडे, सहा.पो.आयुक्त गुन्हे शोध -१, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक - २ भिवंडीचे वपोनि जनार्दन सोनवणे, सपोनि/श्रीराज माळी, सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रविंद्र बी. पाटील, पोउनि/रामचंद्र जाधव, सपोउनि/सुधाकर चौधरी, पोहवा/ निलेश बोरसे, प्रशांत राणे, सुदेश घाग, वसंत चौरे, वामन भोईर पोशि/अमोल इंगळे, विजय कुंभार, सर्फराज तडवी, मपोहवा/अनुष्का पाटील व माया डोंगरे यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर